सकाळ दि. 05.05.2022

# यिन समर यूथ समिटला आजपासून होणार प्रारंभ

## 'चला, घडू देशासाठी,' दोन दिवस तरुणाईंचे मंथन


मंगेश बोरगावकर


सावनी रवींद्र


रमेश परदेशी (पिट्याभाई)

**कोल्हापूर, ता. ३ :** सामाजिक स्वास्थ्यासाठी, सर्वांगीण विकासासाठी तरुणांनी पुढे यावे, या विचारातून 'यिन'चे 'चला घडू देशासाठी' या यूथ समिटचे आयोजन बुधवारपासून (ता. ४) केले आहे. या 'समिट'च्या माध्यमातून राज्यातील लाखो युवक एकत्रित येऊन मान्यवरांच्या उपस्थितीत विचारविनिमय करणार आहेत. येथील स्वामी विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात दोन दिवस ही परिषद होणार आहे.

उद्या (ता. ४) सकाळी ११ वाजता पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल. यावेळी सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सीईओ कौस्तुभ गावडे, पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे डॉ. शीतलकुमार रवंदळे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, युनिक ॲकॅडमीचे एक्झिक्युटिव्ह कोर्स डायरेक्टर प्रवीण चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती असेल. त्यानंतर प्रसिद्ध क्रिएटिव्ह डिझायनर अनंत खासबारदार संवाद साधतील. त्यानंतरच्या विविध सत्रात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक, माजी खासदार राजू शेट्टी, शाहू समूहाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, 'मुळशी पॅटर्न' फेम अभिनेते रमेश परदेशी, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, आमदार ऋतुराज पाटील, आमदार जयश्री जाधव, संदीप नरके, उदय गायकवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, गायक मंगेश बोरगावकर, सावनी रवींद्र, ॲस्टर आधार हॉस्पिटलचे डॉ. अमोल कोडोलीकर आदी तरुणाईंशी संवाद साधतील.

UNIQUE academy Presents YIN SUMMER YOUTH SUMMIT'22 In Association With Powered by PIMPRI CHINCHWAD EDUCATION TRUST (PCET)

गुरुवारी (ता. ५) जिल्हा पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे, 'स्टोरी टेल'चे संस्थापक योगेश दशरथ, विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, योगशिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी, कालिदास पाटील, सचिन कुंभोजे आदी तरुणाईशी संवाद साधतील. समिटला युनिक ॲकॅडमी, पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, सृजन कॉलेज ऑफ डिझाईन ऋतुराज पाटील फाउंडेशन, आमदार जयश्री जाधव, विवेकानंद शिक्षण संस्था, नरके पन्हाळा पब्लिक स्कूल, ॲस्टर आधार हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

पुढारी. दि. 06.05.2022

# खेलो इंडिया नेमबाजी स्पर्धेत ज्ञानेश्वरी पाटीलला कांस्य

**कोल्हापूर :** बेंगळूर येथील जैन विद्यापीठात खेलो इंडिया विद्यापीठ गेम्सअंतर्गत झालेल्या नेमबाजी स्पर्धेत



कोल्हापुरातील ज्ञानेश्वरी जयवीर पाटील हिने पीप साईट एअर रायफल प्रकारात कांस्य पदक पटकावले. शिवाजी विद्यापीठ संघातून ज्ञानेश्वरी ही स्पर्धेत सहभागी झाली होती. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत तीने ६२५.४ गुणांची कमाई करुन पदकांसाठीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या फेरीतही तिने चांगली कामगिरी करुन दाखवत कांस्य पदकाला गवसणी घातली. ती येथील विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थीनी असून तिला प्रशिक्षक संतोष जाधव, आंतरराष्ट्रीय नेमबाज रमेश कुसाळे, तेजस कुसाळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.